MAHARASHTRA VISION FORUM

# महाराष्ट्र व्हिजन फोरम

**समृद्ध महाराष्ट्राचा आवाज व्हा!**

रोहित पवार यांचा युवा केंद्रित सामाजिक उपक्रम

/mahavisionforum

# महाराष्ट्र व्हिजन फोरमची संकल्पना

"Young minds have superfluous possibilities and potentials that if equipped with knowledge and creativity can work wonders for a country"

*- Dr. A.P.J. Abdul Kalam*

देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'आझादी का अमृत महोत्सव' आपण साजरा केला. या ७५ वर्षांत भारताने खूप मोठा पल्ला गाठला आहे. भारताने प्रगती साधली असली तरी, स्वातंत्र्याच्या वेळी आपल्या पूर्वसुरींनी ज्या सामाजिक-राजकीय आणि आर्थिक न्यायाची कल्पना केली होती, ते मिळवण्यात आपण अजूनही काही प्रमाणात मागे आहोत. जगातील सर्वात तरुण लोकसंख्येपैकी एक देश (सरासरी वय २९ वर्षे) म्हणून भारत एका महत्त्वपूर्ण वळणावर आहे. ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने भारताच्या प्रवासाचा सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचा मार्ग युवांच्या शक्तीचा उपयोग केल्याशिवाय आणि त्यांचा शासन आणि निर्णयप्रक्रियेत अर्थपूर्ण समावेश सुनिश्चित केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

आजवर महाराष्ट्र हे देशातील सामाजिक-आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू राहिलेले राज्य आहे आणि देशातील अनेक धोरणांची पायाभरणी महाराष्ट्रातूनच झाली आहे- जसे की रोजगार हमी योजना, मुलींचे शिक्षण, महिला व बाल विभागाची स्थापना करून अर्थसंकल्प तयार करणे, मोफत आरोग्य विमा इ. तथापि, आज आपल्या राज्याच्या निर्मितीच्या ६२ वर्षांनंतर, महाराष्ट्र हे जरी देशातील सर्वात प्रगतीशील राज्यांपैकी एक असले तरी, SDG इंडिया इंडेक्स - २०२० (क्रमांक ९), सामाजिक प्रगती निर्देशांक - २०२२ (क्रमांक २९) यांसारख्या विविध निर्देशांकांमध्ये ते अव्वल राज्यांच्या बाहेर पडले आहे. **राज्यातील सुमारे ६०% लोकसंख्या ४० वर्षांखालील असली तरी, सार्वजनिक धोरण- निर्धारण यंत्रणेत युवांचा सहभाग अत्यल्प आहे.** ४० वर्षांखालील खासदार आणि आमदारांचे प्रतिनिधित्वही विषम आहे. तरुणांसाठी असे कोणतेही व्यासपीठ नाही जिथे ते शासन आणि धोरणनिर्मिती प्रक्रियेत अर्थपूर्ण योगदान देऊ शकतील.

नवीन विचारसरणीच्या माध्यमातून महाराष्ट्रात बदल घडवून आणण्याची युवांमध्ये शक्ती आहे. युवांसाठी धोरण आणि राजकीय प्रक्रियांवर प्रभाव टाकण्यासाठी सक्षम वातावरण विकसित करणे हे महाराष्ट्राच्या उत्कर्षाचे दिवस परत आणण्यासाठी आणि देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणून पुन्हा स्थान निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे आहे.
हा बदल घडवून आणण्यासाठी, महाराष्ट्र व्हिजन फोरम (MVF) एक प्रभावी, सर्वसमावेशक आणि कार्यक्षम व्यासपीठ आहे. यामध्ये युवा महाराष्ट्राच्या विकासाची दृष्टी निश्चित करण्यासाठी थेट योगदान देऊ शकतात. राज्याचा ७५ वा वर्धापन दिन (अमृतमहोत्सव) २०३५ मध्ये साजरा होणार आहे. तोपर्यंत शाश्वत विकास साधण्यायोग्य अजेंडा तयार करण्यासाठी महाराष्ट्रातील युवांना एकत्र आणणारी MVF ही एक प्रभावी चळवळ आहे.
MVF ही धडाडीचे युवा नेते आणि आमदार रोहित पवार यांची संकल्पना आहे. २०१७ मध्ये जिल्हा परिषदेवर निवडून येऊन त्यांनी तळागाळातून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली आणि २०१९ मध्ये राज्य विधानसभेत त्यांनी प्रवेश केला. राजकारण आणि व्यवसाय या दोन्ही क्षेत्रातील त्यांचा प्रवास महाराष्ट्रातील युवांसाठी एक उत्तम आणि आदर्श उदाहरण आहे. MVF हे महाराष्ट्रातील युवांच्या सहभागाने राज्याचा विकास करण्यासाठी टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

# महाराष्ट्र व्हिजन फोरम संक्षिप्त

'महाराष्ट्र व्हिजन फोरम'(MVF) हे राज्यातील युवांसाठी राजकीय आणि धोरण प्रक्रियेवर प्रभाव टाकून महाराष्ट्रासाठी युवा केंद्रित अजेंडा तयार करण्यासाठीचे एक व्यासपीठ आहे. MVF महाराष्ट्रातील युवांना एकत्र आणण्यासाठी एक चळवळ उभारण्याचा प्रयत्न करत आहे. राज्याचा ७५ वा वर्धापन दिन २०३५ मध्ये साजरा करण्यात येणार आहे, तोपर्यंत सर्वसमावेशक शाश्वत विकास साधण्यासाठी राज्यातील युवांच्या सहभागाने अजेंडा तयार करण्याचा MVF चा प्रयत्न आहे. महाराष्ट्राच्या उत्कर्षाचे दिवस परत आणण्यासाठी आणि पुन्हा एकदा देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य बनण्यासाठी युवांच्या सृजनशील विचारांचा उपयोग करणे हे MVF चे उद्दिष्ट आहे.

## महाराष्ट्र व्हिजन फोरममध्ये सहभागी होण्यासाठी -

### 1 मतदान

महाराष्ट्राचे सर्वोच्च प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी मतदान करा.

१२ जानेवारी २०२३ ते
२८ फेब्रुवारी २०२३

### 2 नोंदणी

महाराष्ट्रातील सर्वात महत्वाच्या समस्या सोडवण्यासाठी MVF मध्ये स्वतःची नोंदणी करा.

१२ जानेवारी २०२३ ते
३१ मार्च २०२३

### 3 सबमिट

महाराष्ट्राच्या एका महत्त्वाच्या समस्येवर आपली उपाययोजना सबमिट करा.

१ मार्च २०२३ ते
३१ मार्च २०२३

### 4 सादरीकरण

आपली उपाययोजना तज्ज्ञ आणि आघाडीच्या धोरणकर्त्यांसमोर सादर करा.

१ मे २०२३

MAHARASHTRA VISION FORUM

महाराष्ट्र व्हिजन फोरम मध्ये सहभागी होण्यासाठी भेट द्या http://www.mahavisionforum.com

/mahavisionforum

# रोहित पवार यांचा संदेश

कोणत्याही संस्थेला यशस्वी व्हायचे असेल तर सर्वोत्कृष्ट मनुष्यबळ आणि आवश्यक संसाधनांची आवश्यकता असते. महाराष्ट्राकडे हे दोन्हीही घटक विपुल प्रमाणात आहेत. त्यामुळे महाराष्ट्राला पुढे जाण्यात कोणीही रोखू शकणारे नाही. उद्या देश ज्या गोष्टींचा विचार करेल त्या बाबींवर महाराष्ट्राने आजच विचार केलेला असतो!

माझा महाराष्ट्रामध्ये असलेल्या उच्च क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे. आपल्यातील ही क्षमता प्रत्येकाला ओळखता आली पाहिजे. समृद्धी, रोजगार आणि विकासासह सर्वसमावेशक स्वरूपाचे बदल महाराष्ट्रातील युवा लोकसंख्येसाठी आवश्यक आहेत. 'महाराष्ट्र व्हिजन फोरम'च्या माध्यमातून राज्यातील तरुणाईला एकत्र आणणे तसेच राज्यासाठी युवा-केंद्रित धोरणे आखून राज्याच्या अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत (२०३५) हा बदल घडवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्रातील तरुणाईच्या सर्जनशीलतेचा आणि उद्यमशीलतेचा उपयोग करून राज्याला गतवैभव प्राप्त करून देण्याचे आणि देशातील क्रमांक १ चे राज्य बनवण्याचा MVF चा प्रयत्न आहे.

आपल्या राज्याच्या विकासाच्या प्रवासात आपले योगदान देण्यासाठी महाराष्ट्र व्हिजन फोरमच्या उपक्रमांमध्ये राज्यातील नागरिकांनी सहभागी व्हावे, ही नम्र विनंती!





महाराष्ट्र व्हिजन फोरम मध्ये सहभागी होण्यासाठी भेट द्या http://www.mahavisionforum.com

/mahavisionforum